# अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर

## सार्वजनिक बांधकाम विभाग

## "अतिरिक्त चटईक्षेत्र निर्देशंक पोटी प्रीमियम" - सन २०२६-२७ अंतर्गत

## जाहिर- निविदा क्र. :- ०७/०९ सन २०२६-२७

मा.उपायुक्त, अहिल्यानगर महानगरपालिका **"अतिरिक्त चटईक्षेत्र निर्देशंक पोटी प्रीमियम"** - सन २०२६-२७ अंतर्गत कामांसाठी खालील नमुद कामांसाठी जाहिर निविदा पध्दतीने **B -१** निविदा मागवित आहे. निविदे बाबतच्या या व्यतिरिक्त असलेल्या अटी व शर्ती निविदा फॉर्म मध्ये नमुद केल्या असुन निविदा फॉर्म विक्री व निविदा प्रक्रियेबाबतचा तपशिल खालिल प्रमाणे.

| Sr.No | Envelopes | Start Date & Time | Expiry Date & Time |
|---|---|---|---|
| १ | निविदाविक्री व तयार करणे | ०६/०७/२०२६ १७:४५ | १३/०७/२०२६ १७:४५ |
| २ | निविदास्विकृती | ०६/०७/२०२६ १७:४५ | १३/०७/२०२६ १७:४५ |
| ३ | तांत्रिक व व्यापारी लिफाफाउघडणे | १५/०७/२०२६ सकाळी ११:०५ पासुन | |

| निविदा सुचना क्रमांक | कामाचातपशिल | कामाची निविदा रक्कम (G.S.T.व्यतिरिक्त) | निविदा संच किंमत G.S.T.सह (नापरतावा) | बयानार क्कम | कामाची मुदत | ठेकेदाराचा वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | अहिल्यानगर महानगरपालिका हद्दितील प्रभाग क्र 02 मधील वीर सावरकर रोड येथील गांधी घर ते देवचक्के घर व अंतर्गत भागात रस्ते सिमेंट कॉक्रिटीकरण करणे | रू.९,९३,९५८/- | ५९०/- | रू.९९४०/- | ४ महीने | वर्ग ८ व त्यावरील |

## सर्वसाधारण निविदेचा तपशिल

| | |
|---|---|
| १ | सदर कामाबाबत निविदा अटी शर्ती इ बाबतचा सर्व तपशील निविदा संचामध्ये व जाहिर टेंडर नोटीसमध्ये नमुद केलेला असुन निविदा संच ऑनलाईन पहावयास उपलब्धआहे. |
| २ | निविदा संचाची विक्री **http://mahaetenders.gov.in** या वेबसाईटवरुन फक्त ऑनलाईन चालु आहे. |
| ३ | वरील वेबसाईट वरुन निविदामध्ये सहभागी होण्यासाठी बेबसाईटवर युजर आयडी व पासवर्ड बनविणे बंधनकारक आहे.यासाठी किंवा ई-निविदाबाबत मार्गदर्शनासाठी ०१२०४००१००२/ ०१२०४००१००५ या क्रामांकावर संपर्ककरावा. |
| ४ | निविदा विक्रीच्या शेवटच्या दिवशी संच प्राप्त न झाल्यास व स्विकृती च्या शेवटच्या दिवशी ऑन लाईन सादरीकरण न झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी निविदा धारकाची राहील. |
| ५ | ऑनलाईन निविदा प्रक्रियासाठी निविदाकाराने डिजीटल स्वाक्षरीचा ( **DIGITAL SIGNATURE KEY** ) वापर करावा तसेच **DIGITAL SIGNATURE KEY** उपलब्ध करुन घेण्याची सर्वस्वी जबाबदारी सबंधित निविदा धारकाची राहील. |
| ६ मा. | शासनाचे सार्वजनिक बांधकाम विभागाकडील शासन निर्णय क्रमांक सीएटी २०१७/प्र.क्र.१०३/इमा.२, मंत्रालय, मुंबई — ३२ दि.२३/०७/२०१८ अन्वये मजूर सहकारी संस्था, सुशिक्षित बेरोजगार अभियंता व नोंदणीकृत ठेकेदार पात्र राहतील. तथापि संबधीत ठेकेदाराने अहमदनगर महानगरपालिकेकडे योग्य त्या वर्गाची नोंदणी करुन प्रमाणपत्र घेणे आवश्यक आहे. |
| ७ | दि.२९/०१/२०१९ चे शासन परिपत्रकातील बाब क्र.१ चे तरतूदीनुसार कार्यवाही करणेत येईल. |

| | |
|---|---|
| ८ | उक्त निविदा भरणा-या ठेकेदाराने अहिल्यानगर महानगरपालिकेच्या सार्व. बांधकाम विभागाकडील विकास कामाचे कार्यार आदेश दिलेले काम किंवा कामे योग्य कारणाशिवाय त्याला दिलेल्या मुदतीत पुर्ण न केल्यास ( योग्य कारणाशिवाय ) तो अपात्र राहील. |
| ९ | उक्त निविदा भरणा-या निविदाधारकाने अहिल्यानगर महानगरपालिकेच्या सार्व. बांधकाम विभागाकडील विकास कामाचे कार्यारंभ आदेश करुन घेणेबाबत पत्र दिल्यानंतर दिलेल्या मुदतीत कार्यवाही न केल्यास सदरचा निविदाधारक अपात्र राहील. |
| १० | दि.११/०५/२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये रु.५० लक्षपेक्षा जास्त किंमतीच्या सर्वच निविदामध्ये **Bid Capacity** ची अट लागू आहे, तथापि एकाच कंत्राटदाराने एका वित्तीय वर्षाय तीन किंवा त्यापेक्षा जास्त कामे घेतली असल्यास त्याच्यासाठी त्या वित्तीय वर्षात पुढील निविदांसाठी **Bid Capacity** ची शर्त राहील, याकामी लिफाफा क्र. १ मध्ये चालू वित्तीय वर्षात हाती घेतेलेल्या सर्व कामांची निविदा विषयक माहीती सादर करणे कंत्राटदारास बंधनकारक आहे. |
| ११ | दोन प्रतिस्पर्धी निविदाधारकामध्ये व्यवसायिक हितसंबंध असल्यास किंवा एकत्रीत काम करित असल्यास सदरची निविदा एकच समजून कार्यवाही करण्यात येईल याची निविदाकाराने नोंद घ्यावी. याबाबत रु.१००/- चे स्टॅम्पपेपरवर प्रतिज्ञापत्र सादर करणे बंधनकारक आहे. |
| १२ | ई - निविदा सादरीकरण /स्विकृती फक्त ऑनलाईन पध्दतीने करण्यात येईल. |
| १३ | निविदाधारकास ई-निविदा पोर्टलवर निविदाबाबत "बीड लॉक" झाल्यानंतर कंत्राटदाराने निविदा सादर करावयाच्या वेळेपासुन ७२ तासात तांत्रिक कागदपत्रांची हार्ड कॉपीची एक प्रत बंद पाकीटात इकडील कार्यालयाकडे सादर करणे बंधनकारक आहे. निविदाधारकाने हार्ड कॉपी सादर करताना जमा केल्याच्या कागदपत्रांची संख्या व पान क्रमांक हे अनुसुचीसह ई-निविदा क्रमांक नमुद करुन शहर अभियंता, अहिल्यानगर महानगरपालिका यांचे कार्यालयात जमा करणे बंधनकारक आहे. |
| १४ | तांत्रिक लिफाफा पडताळणी अंती पात्र कंत्राटदाराने" माझा अर्थिक देकार उघडण्यात येवु नये" अथवा " मी स्पर्धेतुन माघार घेत आहे" असे कळविल्यास ते स्पष्टपणे नाकारण्यात येवुन त्याचा अर्थिक देकार उघडण्यात येईल. |
| | |

**सर्वसमावेशक अटी - शर्ती**

| | |
|---|---|
| १५ | सदर कामाची निविदा संच खरेदी किंमत व बयाणा रक्कम ऑनलाईन पध्दतीने ICICI Bank चेखात्यावरभरावी. |
| १६ | निविदा सादरीकरण हे दोन पाकीट पध्दतीने(Technical व Commercial bid) करणे आवश्यक आहे. |
| १७ | **सिलबदतात्रिक लिफाफा क्र . १** मध्ये पुढील कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे |
| अ) | इनकम टॅक्स प्रमाण पत्र प्रत मागील ३ वर्षाचे आवश्यक. |
| ब) | ई.पी.एफ.व जी.एस.टी.रजिस्ट्रेशन नोंदणी प्रमाणपत्र प्रत. |
| क) | सोबत जोडलेल्या यादीतील कंत्राटदारानुसार सन.२०११-१२ ते २०२२-२३पर्यंतचे ई.पी.एफ. भरणा केलेबाबतचे रु. १००/- च्या स्टॅम्प पेपरवर नमुना 'ब प्रमाणे मुळ 'प्रतिज्ञा पत्र |
| ड) | मागील ३ वर्षात हाती घेतलेल्या व पूर्ण केलेल्या कामांच्या किंमतीसह माहितीचा तपशिल कागदपत्रे फॉर्म नं. Iमध्येसादर करणे आवश्यकआहे. |
| घ) | मागील ५ वर्षामध्ये समकक्ष कामे केलेल्या कामांची यादी फॉर्म नं. I I I व शासन निर्णय क्र. सीएटी-२०२२/ प्र.क्र.५०/इमा.२ दि.११/०५/२०२२ नुसार समकक्ष कामाबाबत अनुसुचीसह काम पुर्ण केलेबाबतचा दाखला प्रत्येक कामनिहाय अनुसूची व अनुसूचीतील कामांचा पूर्णत्वाचा दाखला जोडणे बंधनकारक आहे अन्यथा सदर निविदा ग्राह्य धरण्यात येणार नाही. |
| च) | सदर कामाकरीता उपलब्ध असलेल्या कर्मचारी यांची यादी फॉर्म नं. Vमध्ये भरावी. व Declaration Of The CONTRACTOR वर माहिती भरुन स्वाक्षरी करुन त्याची प्रत सोबत जोडावी. |

| | |
|---|---|
| १८अ) | सर्व किमतीच्या ई निविदेसोबत जोडलेली (अपलोड केलेली) सर्व कागदपत्रे खरी असल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र (परिशिष्ट-१) रु.१०० रुपयांच्या स्टॅम्प पेपरवर ( सोबत नमुना 'अ' ) लिफाफा क्र. १मध्ये जोडणे कंत्राटदारास बंधनकारक करण्यात येत आहे. निविदेतील लिफाफा क्र. १ मध्ये तसेच निविदा मंजूरी व नंतर देयके अदा करताना जोडलेली कागदपत्रे खोटी व बनावट असल्याची बाब निविदा उपडल्यानंतर निदर्शनास आल्यास कंत्राटदार पूर्णपणे जबाबदार राहतील. अहिल्यानगर महानगरपालिका जबाबदार राहणार नाहीत. |
| ब) | सा.बां. विभागात निविदेसोबत जोडलेल्या बऱ्याचश्या कागदपत्रांची तपासणी संबंधित उपअभियंता यांचेकडून केली जाते. यामध्ये निविदेसोबत जोडलेल्या खोट्या कागदपत्रांसंदर्भात संपूर्णपणे निविदा सादर करणारे कंत्राटदार जबाबदार राहतील. त्यास अहिल्यानगर महानगरपालिकेचे निविदा छाननी करणारे अधिकारी जबाबदार राहणार नाहीत. |
| क) | कार्यारंभ आदेश दिल्यानंतर कंत्राटदारामार्फत सादर होणाऱ्या देयकांसोबत जोडण्यात आलेली कागदपत्रे खोटी आढळल्यास त्यासाठी संबंधित कंत्राटदार भारतीय दंड संहितेच्या विविध कलमाप्रमाणे कारवाईस पात्र राहतील. अशा निविदेतील कामे प्रारंभिक स्तरावर असल्यास निविदा रद्द केली जाईल. व कंत्राटदारास उपरोक्तप्रमाणे काळ्या यादीत टाकणेत येईल व वरीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल. |
| ड) | निविदा अंतिम करताना व दोष दायित्व कालावधीत मुळ निविदा व त्यानंतरचा पत्रव्यवहार, कंत्राटदराची देयके व त्यासोबतची साहित्य खरेदीची व अन्य बाबीची पुर्तता कागदपत्रे, चाचणी अहवाल इ. गुणवत्ता विषयक कागदपत्रे बनावट आढळल्यास त्या कंत्राटदार संपूर्णतः जबाबदार राहिल. यासाठी अहिल्यानगर महानगरपालिका जबाबदार असणार नाहीत. |
| १९ | **सिलबंददराचालिफाफा क्र२** मध्ये संबंधीतठेकेदाराने निविदासंचामधील Tender for Worksवर दर नमुद करुन स्वाक्षरीसह सोबतजोडणे आवश्यक आहे. |
| २० | अटीयुक्त निविदाविचारातघेतलीजाणारनाही |
| २१ | यशस्वी ठेकेदारास योग्य किंमतीच्या स्टॅम्प पेपरवर करारनामा करुन द्यावा लागेल. |
| २२ | यशस्वी ठेकेदारास कामापोटी २.५% अनामत रकमेपैकी १.५ % (टक्के) अनामत रक्कम रोखीने भरावी लागेल किंवा कार्यारंभ आदेश पुर्वी सेव्हिंग बॅक डिपॉझिट गव्हर्रमेंट प्रॉमिसरी नोटस किंवा नॅशनल सेव्हिंग सर्टीफिकेट अथवा एफ.डि.आर. स्वरुपामध्ये महानगरपालिकेच्या नावे करुन दिलेल्या असल्यास स्विकारण्यात येईल. ( उर्वरीत १% रक्कम महाराष्ट्र लेखासंहीता अधिनियम २०११ मधील परिशिष्ट ३ नियम २६ मध्ये "**निविदा स्विकारण्यात आली तर, इसारा रक्कम, सुरक्षा अनामत ठेवीच्या भागाच्या स्वरुपात घेण्यात येईल आणि ती ठेव नोंदवहीमध्ये हस्तांतरीत करण्यात येईल.**"व तसेच **२.५%** रक्कम बिलातुन वसुल करण्यात येईल. |
| २३ | कुठलेही साहीत्य मटेरीयल महानगरपालिका पुरविणार नाही. |
| २४ | सर्व साहीत्य भारतीय रस्ते माणकाप्रमाणे असणे आवश्यक आहे. वरील कामासाठी वापरण्यात येणारे साहीत्य (मटेरीयल)योग्यअसल्याबाबतचा प्रयोगशाळेकडील अहवाल जिल्हास्तरिय यंत्रणेकडून तपासणी करुन घ्यावी व शासन धोरणा प्रमाणे ( थर्ड पार्टी ) तांत्रिक लेखा परिक्षण हे मा.प्राचार्य, शासकिय अभियांत्रिकी महाविद्यालय, औरंगाबाद किंवा पुणे यांचेकडुन ऑडीट करणे बंधनकारक आहे. तसेच सदर कामाचा तांत्रिक लेखा परिक्षण अहवाल शासकिय यंत्रणेकडे भरताना पावती ' आयुक्त, अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर' करिता ............... ( ठेकेदाराचे नाव) अशाप्रकारे ठेकेदारानेस्वखर्चाने करुन घेउन त्याचे देयक महानगरपालिकेकडे सादर केल्यास त्याचा परतावा करण्यात येईल. तांत्रिक लेखा परिक्षण अहवाल इकडेस प्राप्त झाल्याशिवाय देयक प्रस्तावित करण्यात येणार नाही. ३ लक्षच्या वरील सर्व विकास कामांना ( मनपा फंड/ शासन निधी/आमदार व खासदार निधी) तांत्रिक लेखा परिक्षण बंधनकारक आहे. त्यापैकी ५ लक्षपर्यंत मनपा निधीतील कामांचे तांत्रिक लेखा परिक्षण प्राचार्य, शासकिय अभियांत्रीकी महाविद्यालय, पुणे यांचेकडुन करुन घेणेस मुभा राहिल. |
| २५ | शासन निर्णय क्र. संकिर्ण-२०१८/ प्र.क्र.१५१/ इमारती-२ दि.१४ जानेवारी, २०१९ नुसार डांबरीकरणाच्या कामासाठी दोष दायित्व कालावधी ३ वर्षे, कॉंक्रिटच्या कामासाठी दोष दायित्व कालावधी ३ वर्षे , पुल बांधणेच्या कामसाठी १० वर्षे व रस्ते पॅचिंग करणेसाठी १ वर्ष, नवीन इमारतीचे कामासाठी १० वर्षे, नवीन गटर/ड्रेनेज साठी २ वर्षे इतका राहील याव्यतिरीक्त विविध दुरुस्तीची कामे, सुशोभिकरण व तत्सम कामांना निविदेतील तरतूदीनुसार दोषदायित्व कालावधी निश्चित करण्यात |

| | |
|---|---|
| | आला आहे, तो बंधनकारक करण्यात आलेला आहे. तसेच सुरक्षा अनामत व **Performance Secutiy Deposit** हे दोष दायित्व कालावाधी पुर्ण झालेनंतरच परतावा करण्यात येईल. दोष दायित्व कालावधी काम पुर्ण झाल्याच्या दिनांकापासुन लागु राहील. दोषदायित्व कालावधीत काम खराब झाल्याचे दिसुन आल्यास तसेच याबाबत इकडील विभागाने कळविल्यानंतर १५ दिवसात दुरुस्ती करणे बंधनकारक राहिल. या कालावधीत दुरुस्ती न केल्यास व तसे आढळुन आल्यास ठेकेदार उक्त निविदेसाठी अपात्र राहिल. |
| २६ | टेंडर मधील दर टेंडर उघडलेपासुन **१८०** दिवस ग्राह्य राहतील. |
| २७ | सार्व. बांधकाम विभाग , शासन परिपत्रक कमांक सीएटी/२०१७/प्र.क्र.०८/इमा-२ दि.२६ नोव्हेंबर, २०१८ नुसार निविदा किंमतीच्या १% ते १०% कमी दरापर्यंत १% व १०% पासुन १५% कमी दरापर्यंत ( १५% - १०% = ५% ) तसेच ( १९-१५) =४ करिता ( ४ x २ = ) ८% प्रमाणे डी.डी.सादर करणे अनिवार्य आहे. तसेच लिफाफा २ उघडल्यानंतर प्रथम न्युनतम देकार सादर करणाऱ्या एल-१ निविदाकाराने " **Additional Performance Security Deposit**" आठ दिवसाच्या आत शहर अभियंता यांच्या कार्यालयात जमा करावा. आठ दिवसांची मुदत कोणत्याही कारणासाठी शिथीलक्षम असणार नाही.व सदर अनामत रक्कम कामाचा दोष दायित्व कालावधी संपल्यानंतर परत करण्यात येईल. |
| २८ | सदरच्या कामांवरील साहित्याचे सक्षम प्राधिकरणाचे गुणवत्ता प्रमाणपत्र **(Test Report)** सादर करणे बंधनकारक आहे. |
| २९ | डेप्युटी डायरेक्टर ऑफ इंश्युरन्स महाराष्ट्र राज्य यांचेकडील प्रविनि– २३१४ सा.बां.वि/.विमा वसुली/अभि ३दि.३१/०३/२०१५नुसार शासकीय विमा कार्यारंभ आदेशापुर्वी प्राप्त करुन घेणे अथवा २५ लक्षापर्यंत १% व २५ लक्षचे पुढील रकमेस ०.५०% प्रमाणे रोख स्वरुपात भरणे बंधनकारक आहे. यशस्वी ठेकेदारास कामगार विमा कार्यारंभ आदेशपुर्वी सादर करावा लागेल. |
| ३० | कोणत्याही परिस्थीतीत भाववाढ देय असणार नाही. |
| ३१ | कामाचे देयक उपलब्ध निधीप्रमाणे प्रदान करण्यात येईल. याबाबत निविदाधारक यांना मा.न्यायालयात दाद मागता येणार नाही |
| ३२ | मंजूर निविदाधारकाने काम सुरु करताना भुमिगत कामांचा/ UTILITY बाबत अंदाज घेवूनच संबंधित विभागांना ( उदा. मनपाचे पाणी पुरवठा, घनकचरा, विद्युत, तसेच एम.एस.ई.बी व टेलीफोन विभाग व मोबाईल कंपन्या) अवगत करुनच कामे हाती घ्यावीत. याउपरही काही तुटफुट झाल्यास त्याचे नुकसान निविदाधारकास स्वखर्चाने करावी लागेल. |
| ३३ | केंद्र व राज्य शासन यांच्याकडील सर्व कराधीन नियम व होणारे बदल निविदाधारकांना लागू राहतील. नियमानुसार लागु असलेल्या सर्व शासकीय कपाती निविदाधारक यांनी सोसावयाच्या आहेत. |
| ३४ | भुयारी गटार योजनेअंतर्गत कामाचा समावेश असल्यास कामाचे कार्यारंभ आदेश भुयारी गटर योजनेचे काम झाल्यानंतर देण्यात येतील. |
| ३५ | कोणतीही निविदा स्वीकारणे, नाकारणे अथवा रद्द करणे याबाबतचे अंतिम अधिकार मा. आयुक्त, अहिल्यानगर महानगरपालिका यांना राहतील. |
| ३६ | रस्त्याच्या कामांसाठी आवश्यकती यंत्र सामुग्री जसे हॉट मिक्स/ड्रम मिक्स प्लॅंट ,सेंसर /मेकॅनिकल पेव्हर फिनीशरमेकॅनिकल अस्फाल्ट स्प्रेअर ,व्हायब्रेटरी रोलर तसेच कॉंक्रिटच्या कामासाठी RMC Plant अथवा Transit Ready Mixer रु.१.५० कोटीच्या पुढील कामांसाठी स्वमालकीची असणे आवश्यक आहे. मात्र रु.१.५० कोटीच्या आतील कामांसाठी रक्कम रु. १००/- च्या स्टॅम्प पेपरवर भाडेतत्वाचा करारनामा कामाचे नाव नमुद असणारे प्रतिज्ञा पत्र असणे आवश्यक आहे.मशिनरीच्या मुळ कागदपत्रांची माहिती फॉर्म नं II भरुन जोडण्यात यावी तसेच खालीलनमुद १ ते ५ बाबत कागदपत्रांच्या छायांकित प्रती जोडणे आवश्यक आहे. ( नमुना ' प्रपत्र क ' |
| | (१) RMC Plant अथवा Transit Ready Mixe चा Valid Calibration Report ची प्रत सोबत जोडणे आवश्यक. |
| | (२) वरील नमुद सर्व मशिनरी सुस्थितीत असल्याचे चिफ इंजिनियर (मॅकेनिकल) यांचेकडुन (MOST with SCADA) प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. |

Deposit

| | |
|---|---|
| | (३) प्लँट मनपा.हद्दीपासुन २५ कि.मी.चे आंत असलेबाबत निविदा प्रसिध्दीच्या दिनांकाचे एक वर्षाचे आतील कालावधी शहर अभियंता,अहिल्यानगर महानगरपालिका यांचे प्रमाणपत्र आवश्यक आहे. |
| | (४) डांबरीकरणाच्याकामासाठी मोडर्न ड्रम मिक्स प्लँट (हॉट मिक्स प्लँट) प्लँट हा किमान ३० ते ४० मे. टन तास व त्यावरील क्षमतेचा असणेआवश्यकआहे. |
| | (५) डांबरीकरणाचे / कॉंक्रिटीकरणाचेशासकीय संस्थांचे Design Mix ठेकेदाराच्या नावाने असल्याचा ३ वर्षाच्या आतील मुळ अहवाल सार्व.बांधकाम विभाग, मनपा, अहिल्यानगर या विभागाकडे सादर केलेबाबतचा दाखला जोडणे अनिवार्य आहे. |
| | |

(मा.आयुक्त, अहिल्यानगर मनपा यांचे मंजूरीने)

प्र. शहर अभियंता

अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर

## अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर

सार्वजनिक बांधकाम विभाग

**"अतिरिक्त चटईक्षेत्र निर्देशांक पोटी प्रीमियम" - सन 2026-27 अंतर्गत**

**जाहिर निविदा सूचना क्र. :- ०९ सन 2026-27**

**"अतिरिक्त चटईक्षेत्र निर्देशांक पोटी प्रीमियम" - सन 2026-27 अंतर्गत**

**जाहिर निवीदा नोटीस क्र. --०९-- द्वि-लिफ़ाफ़ा पद्धतीने निवीदा मागविणेसाठी** अहिल्यानगर महानगरपालिकेच्या **http://amc.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. तरी याची संबंधितांनी नोंद घ्यावी.**

प्र. शहर अभियंता
अहिल्यानगर महानगरपालिका


## अहिल्यानगर महानगरपालिका, अहिल्यानगर

सार्वजनिक बांधकाम विभाग

**"अतिरिक्त चटईक्षेत्र निर्देशांक पोटी प्रीमियम" - सन 2026-27 अंतर्गत**

**जाहिर निविदा सूचना क्र. :- ०९ सन 2026-27**

**"अतिरिक्त चटईक्षेत्र निर्देशांक पोटी प्रीमियम" - सन 2026-27 अंतर्गत**

**जाहिर निवीदा नोटीस क्र. --०९-- द्वि-लिफ़ाफ़ा पद्धतीने निवीदा मागविणेसाठी** अहिल्यानगर महानगरपालिकेच्या **http://amc.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. तरी याची संबंधितांनी नोंद घ्यावी.**

प्र. शहर अभियंता
अहिल्यानगर महानगरपालिका